# जळगाव विमानतळाचा विस्तार करा!

## खा.स्मिता वाघ यांचे ना.मोहोळ यांना निवेदन

■ अमळनेर । प्रतिनिधी

उत्तर महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या जळगाव विमानतळाच्या सर्वांगीण विस्तारासाठी खासदार स्मिता उदय वाघ यांनी नवी दिल्ली येथे नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व अधिकाऱ्यासहित बैठक घेऊन विस्तृत चर्चा करून निवेदन सादर केले.



या निवेदनात विमानतळाच्या धावपट्टीपासून टर्मिनल व एप्रनच्या विस्तारापर्यंत महत्त्वाच्या मागण्या ठेवण्यात आल्या. खासदार वाघ यांनी यावेळी खालील मुख्य मुद्दे उपस्थित केले: धावपट्टीचे समतलीकरण करून अडथळे दूर करणे व लँडिंग अधिक सुरक्षित करणे, प्रवासी संख्येनुसार टर्मिनलचा तातडीने विस्तार करणे, एकाचवेळी तीन एटीआर विमाने थांबू शकतील असा एप्रन विस्तार करणे,मास्टर प्लाननुसार नवीन टर्मिनलसाठी तातडीने निधी मंजूर करून काम सुरू करणे. खासदार वाघ यांनी स्पष्टपणे सांगितले की, एप्रिल २०२४ पासून फ्लाय ९१ व अलायन्स एअरने सेवा सुरू केल्यानंतर जळगाव विमानतळावर प्रवाशांची संख्या लक्षणीय वाढली आहे. हे विमानतळ आज जळगाव, धुळे, बुलढाणा, अजिंठा लेणी, तसेच मध्यप्रदेशातील बुरहानपूरसारख्या सीमाभागातील १ कोटीहून अधिक लोकसंख्येसाठी केंद्रबिंदू ठरले आहे. जळगाव विमानतळ हे महाराष्ट्रात ५ व्या क्रमांकाचे आहे.

आज मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर नंतर जळगावचा नंबर लागतो. प्रवासी संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे. केंद्र सरकारकडून लवकरच सकारात्मक निर्णय अपेक्षित असून, त्यानंतर जळगाव विमानतळाचा विस्तार निश्चित होईल. हा निर्णय केवळ हवाई दळवळदळापुरता मर्यादित न राहता, उत्तर महाराष्ट्राच्या पर्यटन, व्यापार, कृषी व औद्योगिक विकासास गती देणारा टर्निंग पॉईंट ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




## विधीलिखित

सुरेशराव बोरकर,
ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय,
रावेर. मो. : ९८५००१५५५८

शनिवार, दि. २६ जुलै २०२५

*-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*

**मेष** – विद्यार्थीवर्गासाठी अती उत्तम दिवस.
**वृषभ** – विद्यार्थीवर्गास प्रवास करावा लागेल.
**मिथुन** – सर्व दिवस कार्य करण्यात जाईल.
**कर्क** – शालेय कार्यासाठी वेळ द्यावा लागेल.
**सिंह** – मनाविरुद्ध वातावरण राहील.
**कन्या** – भूमीविषयक कार्य संपन्न कराल.
**तूळ** – वडिलांच्या ओळखीतून कार्य संपन्न होईल.
**वृश्चिक** – आज नवीन मार्गाने चालाल.
**धनू** – मानसिक ताण आज राहील.
**मकर** – विद्यार्थीवर्गास अती उत्तम दिवस.
**कुंभ** – चूक तर झाली हे समजून येईल.
**मीन** – खोटेपणा बोललेले उघड होईल.




## बोदवड महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन

■ बोदवड । प्रतिनिधी

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील गणित विभागातर्फे गणिताविषयी जागृती व्हावी म्हणून अँप्रॉक्सिमेट पाय दिवस नुकताच साजरा करण्यात आला. संस्थेचे चेअरमन मिठूलाल अग्रवाल यांच्या प्रोत्साहनातून आणि महाविद्यालयातील प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांच्या नेतृत्वाखाली गणित विभागातर्फे अँप्रॉक्सिमेट पायदिनानिमित्त प्रथम,द्वितीय वर्ष विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांनी पाय संकल्पनेचे उपयोग आणि त्यावरील सुविचार संकलन यासारख्या विविध उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. उपप्राचार्य डॉ.विनोदकुमार चौधरी, गणित विभागप्रमुख डॉ.रुपेश मोरे, रिहान शेख, शिवम डहाके, पाटील, प्रतीक्षा पाटील आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवर्गाने परिश्रम घेतले.




देशदूत हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने***. **फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)

cmyk